Impact Factor 5.307 (SJIF)
**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173

# आर्थिक विकासात वित्तीय प्रणालीची भूमिका व कार्याचे अध्ययन

**डॉ. संजय दौलतराव बेले**
उपप्राचार्य,
डॉ. आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चंद्रपूर
९५१८५०१३०८, ९४२१७४०७३०
sanjaydbeley1@gmail.com

**सारांश :**

वित्तीय व्यवस्था ही देशाच्या आर्थिक विकासातील सर्वात महत्त्वाची बाब आहे. वित्तीय प्रणाली ही देशातील बचत आणि गुंतवणूक करू शकणाऱ्या लोकांमध्ये निधीचा प्रवाह व्यवस्थापीत करते. सार्वजनिक सत्ता असो किंवा लोकतांत्रिक सरकार असो किंवा खाजगी तसेच औद्योगिक प्रतिष्ठान असो या सर्वच क्षेत्रांमध्ये वित्ताची आवश्यकता आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास हा देशातील बचतीत आणि गुंतवणुकीत वृद्धी होऊन देशातील उत्पादनाच्या प्रमाणात आणि सेवांत वृद्धी होण्यावर अवलंबून असतो. आर्थिक विकासाच्या प्राथमिक अवस्थेतून बाहेर पडल्यावर प्रत्येक देशात कायदेशीर चलनाव्यतिरिक्त काही वित्तीय साधनांचा उपयोग होतो. कोणत्याही देशाच्या वित्तीय व्यवस्थेत तज्ज्ञ आणि सामान्य वित्त संस्था, संघटित आणि असंघटित वित्तीय बाजारपेठा, वित्तीय संसाधने आणि पैसे पाठविण्याच्या सेवा या सर्वांचा समावेश होतो. अर्थव्यवस्थेत असणाऱ्या परस्परांशी संबंधित अशा वित्तीय संस्था, दलाल, बाजार, व्यवहार, प्रथा, हक्क आणि देणी या सर्वांचा समावेश होतो. वित्तीय व्यवस्था पैसा, कर्ज आणि वित या सर्वांशीच संबंधीत आहे.

अर्थव्यवस्थेत मुद्रेचा प्रवाह सतत चालू ठेवणे हे वित्त प्रणालीचे महत्त्वपूर्ण कार्य आहे. अर्थव्यवस्थेत कार्य करणाऱ्या संस्थांचे कार्ये, भौगोलिक व क्षेत्रीय व्याप किंवा त्यांच्या मालकीचा प्रकार यानुसार वर्गीकरण केले आहे. वित्तीय संस्थांचे बॅंकिंग आणि बॅंकेत्तर संस्था असे वर्गीकरण करण्याचा प्रघात आहे. वित्तीय प्रणालीमुळे पैशाच्या देण्याघेण्याची यंत्रणा अधिक कार्यक्षम होते. अर्थव्यवस्थेतील उत्पादन, विनिमय, वितरण या कार्याच्या प्रत्येक स्तरावर विता प्रणालीची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

प्रस्तुत शोध निबंधात आर्थिक विकासात वित्त प्रणालीची भूमिका व कार्याचे अध्ययन करण्यात आले आहे.

**बीज शब्द :**

आर्थिक विकास, वित्तीय प्रणाली, वित्तपुरवठा, वित्तीय संस्था, मौद्रिक धोरण

**प्रस्तावना :**

शोधनाचे साधन उपलब्ध करण्याची कृती म्हणजे वित्त होय. वित्तीय प्रणालीच्या माध्यमाद्वारे आर्थिक विकासाचे उद्दिष्ट गाठले जातात. आर्थिक विकासात वित्तीय व्यवस्थेचा कार्यभाग असतो. सध्याच्या आर्थिक सिद्धांतामध्ये वित्त व्यवस्था आणि आर्थिक विकास यांच्या संबंधाबद्दल सर्वमान्य असे प्रतिमान उपलब्ध नाही. आर्थिक विकासात व्यक्ती, व्यावसायिक संस्था आणि शासन सहभागी असतात. आर्थिक

विकासात या घटकांच्या सहभागाप्रमाणे वित्तपुरवठा किंवा द्रव्यसाठा याचाही महत्त्वाचा सहभाग असतो. व्यक्तीला आपल्या घरगुती गरजा पूर्ण करण्यासाठी वित्ताची गरज असते. व्यापारी आणि व्यावसायिकांना आपल्या व्यावसायिक योजना साकार करण्यासाठी तसेच माल खरेदी—विक्रीसाठी वित्त लागते. उद्योग किंवा व्यवसायातील कर्मचारी वर्गाचा पगार किंवा वेतन भागविण्यासाठी वित्तपुरवठा आवश्यक ठरतो. व्यावसायिकांना काहीवेळा यंत्रसामुग्री आणि इमारतीत पैसा गुंतवावा लागतो. देशातील शेतकरी वर्गाला शेतीची कामे पार पाडण्यासाठी निधीची गरज असते. देशाच्या शासनास बहिर्गत शत्रूंपासून संरक्षण देणे, अंतर्गत शांतता राखणे आणि विकास कार्य चालविणे, यासाठी मोठ्या प्रमाणात वित्तपुरवठ्याची गरज असते. या सर्वच घटकांना वित्तपुरवठा आवश्यक असतो आणि त्यांच्याशिवाय त्यांची कार्ये चालू राहणे अवघड आहे. देशाच्या आर्थिक विकासातून नागरिकांचा विकास त्यांच्या राहणीमानात वाढ, बचतीत वाढ, मागणीत वाढ, बाजारपेठांचा विकास आणि पुन्हा गुंतवणुकीत वाढ आणि विकासाचे चक्र अधिक गतिमान करण्याचे कार्य वित्त प्रणालीद्वारे पार पाडले आहे.

जसाजसा काळ बदलत गेला तसतसा वित्तीय व्यवस्थेकडे पाहण्याचा दृष्टीकोनही बदलत गेला. वित्तीय व्यवस्थेमुळे बचतीचा उपयोग, मौल्यवान धातू, हिरेमाणके, जमीन जुमला, उपभोग्य टिकाऊ वस्तू आणि चलनाच्या स्वरूपात उत्तरोत्तर कमी होऊन या बचती रोखे, युनिट्स यासारख्या उत्पादन मालमत्तेत ठेवण्याला उत्तेजन मिळाले. वित्तीय व्यवस्थेमुळे गुंतवणूकीच्या परिमाणातही वाढ झाली. तूट असणाऱ्या घटकांना अधिक गुंतवणूक करणे शक्य झाले.

**संशोधनाचा उद्देश :**

१. आर्थिक विकासात वित्तीय प्रणालीच्या भूमिकेचे अध्ययन करणे.

२. आर्थिक विकासात वित्तीय प्रणालीच्या कार्याचे अध्ययन करणे.

**संशोधनाचे गृहिते :**

१. अर्थव्यवस्थेत वित्तीय प्रणालीमुळे मौद्रिक धोरण ठरविणे सुलभ होते.

२. वित्तीय प्रणालीमुळे आर्थिक विकास घडून येतो.

**आर्थिक विकासात वित्तीय प्रणालीची भूमिका :**

आर्थिक विकासात वित्तीय प्रणालीची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. व्यवसाय आणि उद्योगांना वित्तीय प्रणालीद्वारे वित्तपुरवठा केला जातो ज्यामुळे रोजगारामध्ये वाढ होते आणि परिणामी आर्थिक कार्य आणि देशांतर्गत व्यापार वाढून आर्थिक गुंतवणुकीची कार्यक्षमता सुधारण्यास मदत होते. अर्थव्यवस्थेत व्यापक दृष्टीकोनावर आधारित कार्य, सूक्ष्म दृष्टीकोनावर आधारित कार्य आणि सामान्य दृष्टीकोनावर आधारित कार्य इत्यादी प्रकारची कार्ये असतात.

अर्थव्यवस्थेतील उत्पादन, विनिमय, वितरण हया कार्याच्या प्रत्येक स्तरावर वित्ताची भूमिका महत्त्वाची असते. अर्थव्यवस्थेत उद्योगाची योजना आखणे, त्यासाठी आवश्यक घटकांशी जुळवाजुळव करणे यंत्रसामुग्रीची स्थापना करणे, संघटनेची व व्यवस्थापनाची रचना करणे, तंत्रज्ञानाचा वापर करणे, उत्पादनाची सुरूवात, बाजारपेठेत शिरकाव व विक्री इत्यादी सर्व कार्यासाठी वित्त किंवा अर्थपुरवठा हा मूलभूत आधार असतो. उत्पादन निर्मिती किंवा सेवा कार्याच्या सुरूवातीपासून विक्रिपर्यंतच्या सर्व योजनांना प्रगतीकडे रेटणारा वित्त हाच महत्त्वाचा घटक आहे. म्हणून वित्त या घटकास उद्योगाचे रक्त मानले आहे. कोणताही उद्योजक,

Research Hub International Journal

व्यापारी, व्यावसायिक वित्त किंवा अर्थ या घटकाशिवाय हाती घ्यावयाच्या उपक्रमाच्या बाबतीत विचार करू शकत नाही. सर्व घटकात वित्त हा घटक महत्त्वाचा असतो. म्हणून अर्थव्यवस्थेत कार्यरत असणाऱ्या नफा कमविणाऱ्या किंवा न कमविण्याऱ्या संस्थांच्या कार्यामागे अर्थ किंवा वित्त हा घटक मूलभूत प्रेरणा म्हणजे कार्य करित असतो. देशाच्या अर्थव्यवस्थेत उद्योग व्यवसायाचे महत्वाचे स्थान असते समाजाच्या दृष्टीने उपयुक्त असणाऱ्या उद्योग व्यवसाच्या योजना आखण्यासाठी वित्त पुरवठा विचारात घेणे आवश्यक आहे.

वित्तपुरवठा हा घटक उद्योजकांना मदत करून त्याचा उद्योग व्यवसाय उभारणीच्या योजना आखण्यास मदत करतो. वित्ताच्या अभावामुळे बरेच व्यवसाय उद्योग स्थापनेच्या योजना केवळ कागदावर राहिल्याचे निदर्शनास येते. योग्य वित्त प्रणालीमुळे उद्योग अस्तित्वात येवून उत्पादनाच्या कार्यास चालना मिळते. देशाच्या अर्थव्यवस्थेत कार्यरत असलेल्या सर्वच प्रकारच्या उद्योग व्यवसायाला प्रेरणा किंवा चैतन्य निर्माण करण्याचे कार्य वित्त प्रणाली करीत असते. वित्तपुरवठयामुळे उद्योग, मानवी व यंत्रशक्तीद्वारे निर्धारित उद्दिष्ट पूर्ण करून कार्यप्रवण होतो. उद्योग उभारण्यासाठी आवश्यक जमीन, इमारती, यंत्रसामुग्री, कच्चा माल यासारखे घटक गोळा केले जातत. या घठकांचा योग्य वापर उद्योगाच्या अर्थिक निर्णयावर अवलंबून असतो. वित्त पुरवठा हा घटक असे निर्णय घेण्यास प्रेरणा देतात व त्यामुळे उद्योगाजवळील साधन संपत्तीचा योग्य वापर होण्यास मदत मिळते. बॅकासारख्या वित्तीय संस्थाचा आर्थिक विकासात महत्त्वाचा वाटा आहे. बॅक अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रामध्ये संसाधनांचे वाटप करण्यास मदत करतात.

आधुनिक काळात मोठमोठ्या उद्योगांना उत्पादन कार्यात सातत्य ठेवण्यासाठी नवीन उत्पादन योजना आखून त्यावर कार्यवाही करण्यासाठी विविध प्रकारच्या संशोधनासाठी तसेच मुख्य उत्पादनाशी संबंधित दुय्यम व पुरक उत्पादनांचे उद्योग सुरू करण्यासाठी वित्त पुरवठा हा घटक प्रेरणा देत असतो. वित्त पुरवठ्यामुळेच समाजाला आवश्यक ठरणाऱ्या उत्पादनाचे प्रकल्प सुरू करणे शक्य झाले आहे. उद्योगातील उत्पादन हे उपभोगण्यासाठी असते. उत्पादनाला उपभोक्त्यापर्यंत पोहचविण्यासाठी विपणन श्रृंखला कार्य करीत असते. या वितरण श्रृंखलेला आपले कार्य प्रभावीपणे करण्यसाठी वित्तपुरवठा या घटकाची आवश्यकता भासते. वित्त प्रणालीमुळे विपणन कार्याचा वेग वाढून उत्पादनाची चक्रे सातत्याने सुरू राहतात.

देशाच्या अर्थव्यवस्थेत कार्यरत असणारा मानवी घटक आर्थिक मूल्ये निर्माण करण्यासासठी धडपडत असला तरी त्यामागे स्वत:चे हित साधणे ही भावना असते. वित्तरूपाने त्यांच्या हातात येणारा पगार किंवा मजूरी त्यांना अर्थिक मूल्ये निर्माण करण्यासाठी प्रेरणा देत असतो. कर्मचाऱ्याला मिळणाऱ्या मोबदल्यावर त्याची आर्थिक मूल्ये निर्माण करण्यातील सहभाग अवलंबून असतो. वित्त हिच त्यामागील प्रेरणा असते. नियमित पगार, पगारवाढ, बोनस व इतर लाभाच्या प्रमाणावर कर्मचाऱ्याची क्षमता व सहकार्य आधारित असते. समाजहिताचा उद्देश साध्य करण्यासाठी वित्त प्रणालीची भूमिका फार महत्त्वाची आहे. समाज अर्थयवस्थेतील उद्योग, व्यवसाय, व्यापार, सामाजिक, सांस्कृतिक, धर्मिक, राष्ट्रीय, कला, क्रीडासंस्था इत्यादी उपक्रमामागे नफा प्राप्ती बरोबरच सामाजिक हित साधण्याचा हेतु असतो. वित्त मदतीमुळेच समाजाचा धार्मिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक विकास होत असतो. वित्तपुरवठा हा घटक व्यवस्थापनास निर्णय घेण्यास प्रेरणा देवून निर्णयाची योग्य अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने मदत करीत असतो. व्यवस्थापन घेत असलेला कोणताही निर्णय वित्तपुरवठा या घटकांशी जोडलेला असतो. वित्तप्रणाली अल्पकालीन दायित्वाचे दीर्घकालीन गुंतवणुकीत रूपांतरीत करते. वित्तीय प्रणाली धोकादायक गुंतवणुकीचे जोखीमयुक्त गुंतवणुकीत

रूपांतर करण्यास मदत करते. तसेच सुविधा संप्रदायाचे माध्यम म्हणून देखील महत्त्वाची भूमिका पार पाडित आहे.

वित्तीय प्रणाली सरकारला निधी उभारण्यास सक्षम करते, त्यांना कमी व्याजदराने कर्ज घेण्यास मदत करते. सरकार बिले आणि रोखे जारी करून भांडवली गरजा पूर्ण करण्यासाठी सरकारी रोखे बाजारातून अल्पकालीन आणि दीर्घकालीन निधी उपलब्ध करून देतात. ज्यामुळे आर्थिक विकास सुनिश्चित होतो. देशाचे सरकार देश संरक्षणाबरोबर अंतर्गत शांतता व सुव्यवस्था राखणे आणि देशातील उद्योग व्यवसायांचे कार्य सुरळीत चालू देण्यास मदत करतात. हे कार्य करण्यासाठी वित्ताची आवश्यकता असते. वित्तीय प्रणालीमुळे उद्योग व्यवसाय उत्तम पध्दतीने चालून भरपूर नफा कमवितात व कराच्या रूपाने सरकारला निधी उपलब्ध करून देतात. देशातील विविध संस्थाच्या व नागरिकांच्या विकासावर देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो. देशाच्या एकूण चलन पुरवठयावर आणि व्यााजदरावर नियंणण ठेवून त्यामध्ये सरकारच्या आर्थक धोरणानुसार बदल करण्याच्या कार्याला ढोबळमानाने मौद्रिक धोरण म्हणतात. मौद्रिक धोरण हे सरकारच्या धोरणाचाच एक भाग आहे. अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रात विकास साधण्यासाठी वित्तीय प्रणाली महत्त्वाची भूमिका बजावित आहे.

**आर्थिक विकासात वित्तीय प्रणालीची कार्ये :**

परंपरागत दृष्टीकोनानुसार वित्तीय कार्याचा संबंध म्हणजे व्यवसायात येणाऱ्या गरजेप्रमाणे भांडवलांची उपलब्धता करून देण्यापुरताच मर्यादित आहे. पुढे वित्तीय व्यवस्थेच्या कार्यामध्ये रोख रकमेची व्यवस्था करणे आणि देशातील व्यवसायांच्या विकासासाठी निर्माण करण्यात आलेल्या निधीमध्ये तरलता निर्माण करणे या दोन कार्यावर भर देण्यात आला. वित्तीय प्रणालीमेमुळे बाजारपेठांच्या क्षेत्रामध्ये विस्तार घडून आला. व्यवस्थेच्या कार्याचा संबंध फक्त तरलतेशीच जोडणे मर्यादित विचार मानला आहे. आज देशातील व्यवसायांच्या विकासासाठी निर्माण करण्यात आलेल्या वित्ताचा योग्य उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने गुंतवणूकीसंबंधी निर्णय घेणे, भांडवल प्राप्त करणे, नियोजन करणे, भांडवलाचा उपयोग करून घेणे, आधुनिक विचारानुसार वित्तीय संस्था, संघटन, नियोजन या कार्याबरोबर या योजनांचे मूल्यपामन केले जाते. सार्वजनिक सत्ता असो किंवा लोकतांत्रिक सरकार असो किंवा खाजगी तसेच औद्योगिक प्रतिष्ठान असो या सर्वच क्षेत्रांमध्ये वित्ताची आवश्यकता आहे. वित्तीय कोशाचे प्रबंधन करणे हे वित्तीय प्रणालीचे प्रमुख कार्य होय. अर्थव्यवस्थेत केंद्रिय अधिकोशामार्फत वित्तीय कोशाचे प्रबंधन केले जाते. उपलब्ध संसाधनाचा आदर्शरित्या उपयोग व्हावा अशा प्रकारच्या सोयी सवलती निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य वित्तीय प्रणालीला करावयाचे असते. याकरिता संसाधनांचे आवंटन, त्यांचे भविष्यकालीन उपयोग तसेच अर्थव्यवस्थेला गती देण्याकरिता आवश्यक तरल संपत्ती संरचना स्थापित करणे इत्यादी कार्ये वित्तीय प्रणाली करीत असते. अर्थव्यवस्थेत मुद्रेच्या आवश्यकतेनुसार पुर्वानुमान करणे, कोशांचे संग्रहण करणे, तसेच अर्थव्यवस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या कोशांच्या प्रवाहाची व्यवस्था करणे इत्यादी कार्ये करावी लागतात. अर्थव्यवस्थेत उत्पादन व्यय, नियंत्रण मूल्याची निश्चिती इत्यादी कार्ये वित्तीय प्रणालीच्या कार्याच्या अंतर्गत येतात. कोशाचे नियमन व नियंत्रण हे एक महत्त्वपूर्ण असे वित्तीय कार्य आहे. याकरिता वित्तीय मापदंड निर्धारित करण्यात येतात. कोशांच्या खर्चाची मर्यादा जास्त असल्यास त्यांना नियंत्रित करण्याचे प्रयत्न करण्यात येतात. कोशांची उपलब्धता ही नेहमीच मर्यादित असते म्हणून कोशांवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य महत्त्वाचे ठरते.

प्रत्येक व्यवसायात किंवा पेढीत दररोज रोख मिळकत येत असते. तसेच रोख रकमेद्वारे किंवा धनादेशाद्वारे देणी फेडल्या जातात. रोज मिळणारी मिळकत ही बॅंकेच्या चालू खात्यात जमा किंवा संग्रहीत होते. हे वित्तीय प्रणालीचे एक आवश्यक कार्य आहे. उपक्रमात मिळालेली मिळकत सुरक्षितपणे विनियोजित करणे हे वित्तीय कार्याचे महत्वपूर्ण अंग आहे. दररोज प्राप्त होणारे उत्पन्न बॅंकेत जमा करणे, उत्पन्न इतर सुरक्षित ठिकाणी गुंतविणे इत्यादी कार्ये सामान्य दृष्टीकोनावर आधारित कार्ये आहेत. बऱ्याचदा उपक्रमांचे व व्यवसायांचे व्यवहार हे रोख व उधार अशा दोन प्रकारचे असतात. अशाप्रकारे वित्त विभागात रोख कोशाबरोबर उधार कोशही निर्माण होते. या कोशांचे स्वतंत्रपणे लेखांकन करणे हा वित्तीय प्रणालीच्या कार्याचा भाग आहे. उपक्रम व प्रतिष्ठान यांच्यामार्फत कर्मचारी, ग्राहक तसेच समाजातील दुर्बल घटक यांच्याकरिता कल्याणकारी योजना चालविण्यात येत असतात. हा खर्च चालविण्याकरिता कल्याण कोश निर्माण केले जातात. पेंशन योजना, कर्मचारी कल्याण कोश, भविष्यनिधी कोश, शिक्षण कोश, घरकुल कोश इत्यादी कल्याणकारी कार्ये वित्तीय प्रणालीच्या सामान्य कार्यात येतात.

अर्थव्यवस्थेच्या कल्याणासाठी वित्तीय प्रणाली महत्त्वपूर्ण माहिती प्रदान करीत असते. बाजारांमध्ये प्रदान केलेली सर्वात महत्त्वाची माहिती म्हणजे किंमतीबद्दलची माहिती. ज्यावर सर्व आर्थिक सिद्धांत विकसित केले जाते. त्यावरच सर्व निर्णय घेतले जातात. आर्थिक व्यवस्थेमध्ये विशिष्ट बाजारपेठांच्या गरजा लक्षात घेऊन तयार केलेल्या विविध प्रणालीचा समावेश आहे. त्यामुळे आर्थिक विकासात वित्तीय प्रणालीचे अनेक कार्य आहे.

**निष्कर्ष :**

आर्थिक विकासात वित्तीय प्रणालीची महत्त्वपूर्ण भूमिका आहे कारण बचत आणि गुंतवणूक या दोन्हीला प्रोत्साहन देते. बचतीचे एकत्रीकरण आणि वाटप करण्यासाठी मदत करते. वित्तीय प्रणालीमुळे वित्तीय संस्था व बाजारपेठेचा विस्तार सुलभ झाल्याचे दिसून येते. भांडवलाच्या निर्मितीमध्ये वित्तीय प्रणाली महत्वाची भूमिका आहे. विदेशी विनिमयाचा कारभार हा सुद्धा मौद्रिक धोरणाचाच भाग आहे आधुनिक काळात प्रत्यय मुद्रेला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. कृषी, व्यापार व उद्योग यांच्या विकासाठी मौद्रिक धोरण ठरविणे फार आवश्यक आहे. योग्य वित्तीय प्रणालीमुळे मौद्रिक धोरण ठरविणे सुलभ असल्याचे दिसून येते. सामन्यपणे प्रत्येक समस्येचे केंद्र वित्तपुरवठा असते. विविध वित्तीय संस्था आर्थिक वाढीचा समतोल राखण्यात आणि देशातील डेबिट आणि क्रेडिटचा प्रवाह वाढविण्यासाठी मदत करतात. दीर्घकाळ चालू राहणाऱ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांना निधी देण्यासाठी बॅंका आणि कर्जधारकांवर आधारित प्रणाली तयार केली गेली आहे. संबंधित जोखीम घेऊन व्यवसायात थेट सहभागी होऊ इच्छिणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी इक्विटी आधारित सिक्युरिटीज तयार करण्यात आल्या आहेत. ग्रामिण विकासाच्या मदतीने देशाची एकूण आर्थिक व्यवस्था सुधारत आहे. वित्तपुरवठा झाला तर समस्येची सोडवणूक होऊ शकते. देशाच्या अर्थव्यवस्थेत वित्तीय प्रणाली अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडीत असल्यामुळे देशाचा आर्थिक विकास होत असल्याचे दिसून येत आहे. अर्थव्यवस्थतेतील सर्वच घटकांनी एकत्र येऊन अशा वित्तपुरवठ्यासाठीची सुयोग्य यंत्रणा निर्माण करणे गरजचे आहे. त्यामुळे सर्वच घटकांच्या गरजा पूर्ण होतील आणि अर्थिक विकासाचा अपेक्षित वेग राखला जाईल.

Research Hub International Journal

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. डॉ. अरविंद शेंडे, डॉ. देवेंद्र मोहतुरे, डॉ. राजेश इंगोले, भारतीय वित्त व्यवस्था – अनुराधा प्रकाशन, नागपूर.

२. प्राचार्य सु. रा. ओझरकर – राजस्व (सार्वजनिक आय–व्यय) – विद्या प्रकाशन, रूईकर रोड, महाल, नागपूर

३. डॉ. शंकर केशव मोडक – आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र – विद्या प्रकाशन, नागपूर

४. Dr. Rajesh Kumar - Research in Commerce – Paradise Publishers, Jabalpur (India)

५. https://byjus-com.translate.goog/govt-exams/indian-financial-system/?_x_tr_sl=en&_x_tr_tl=mr&_x_tr_hl=mr&_x_tr_pto=sc

६. http://tumkuruniversity.ac.in/oc_ug/comm/IFS%20FINAL.pdf

७. https://www-managementstudyguide-com.translate.goog/functions-of-a-financial-system.htm?_x_tr_sl=en&_x_tr_tl=mr&_x_tr_hl=mr&_x_tr_pto=sc


Research Hub International Journal